# श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली, जि. बुलडाणा
## राष्ट्रीय सेवा योजना
## सत्र २०१९ – २०२०
## अहवाल

- दि. २५ जून २०१९ रोजी 'वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन' या शासनाच्या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात १२० गड्डे करण्यात आले.
- दि. १ जुलै २०१९ रोजी 'वृक्षारोपन' या कार्यक्रमांतर्गत मा. प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली १२० वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. त्यामध्ये कडूनिम, वड, पिंपळ, गुलमोहर, जांभूळ, सप्तपर्णी व नारळ इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली.
- दि. ३ जुलै २०१९ रोजी 'वृक्षारोपन' या कार्यक्रमांतर्गत पुन्हा महाविद्यालय परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली.
- दि. ११ जुलै २०१९ रोजी 'व्यसनमुक्ती' या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत असणा—या व्यसनाधीनतेला आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे आणि कु. किशोरी काटोले यांनी व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन आपल्या भाषणातून रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केले होते.
- दि. १४ जुलै २०१९ रोजी 'गांजरगवत निर्मुलन' या कार्यक्रमातर्गत महाविद्यालय परिसरातील गांजर गवत रासेयो स्वयंसेवकांनी काढून महाविद्यालय स्वच्छ केले.
- दि. २१ जुलै २०१९ रोजी 'उद्बोधन वर्ग' या कार्यक्रमांतर्गत रासेयो चळवळ व राष्ट्रीय सेवा योजनाचे सामाजिक जाणीव जागृतील योगदान या बद्दल माजी रासेयो संचालक डॉ. गणेश मालटे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा शेवट रासेयो प्रार्थनेने करण्यात आला.
- दि. २८ जुलै २०१९ रोजी 'व्यक्तीमत्व विकास' या कार्यक्रमांतर्गत रासेयो मधून अष्टपैलू व्यक्तीमत्वाची जडणघडण होत असल्याचे प्रतिपादन प्रा. विष्णु पडवाल यांनी केले. या बरोबरच रासेयो चळवळीतून संकल्प फाऊंडेशन चालविणारे श्री नंदु पालवे व सौ. आरती एन. पालवे तयार झाल्याचे सांगितले.
- दि. ४ ऑगस्ट २०१९ रोजी 'स्वच्छता अभियान' या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालय परिसर आणि ग्रामीण रूग्णालय चिखली येथे स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले.
- दि. ५ ऑगस्ट २०१९ रोजी विद्यापीठस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभा, संगाबाअवि, अमरावती येथील कार्यक्रम अधिकारी सभेत प्रा. वि. रा. पडवाल सहभागी झाले होते.

- दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी 'स्वातंत्र्यदिनानिमित्त' महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान व स्वच्छतेसंबंधी जनजागृती करण्यात आली आणि सर्वांनी स्वच्छतादूत म्हणून काम करण्याची शपथ घेतली होती.
- दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी 'नेतृत्वगुण विकास' कार्यशाळा या कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण कसे विकसित करावे याबद्दल प्रा. डॉ. जे. जे. जाधव सर यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.
- दि. ३० व ३१ ऑगस्ट २०१९ रोजी पूर्व पथसंचालन निवड चाचणी शिबिर, अमरावती येथे कु. शिला सत्यवान सावंत आणि धोंडू सुभाष सुलताने यांनी सहभाग नोंदविला होता.
- दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी 'शिक्षक दिन' या कार्यक्रमातंर्गत रासेयो स्वयंसेवकांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षकी पेशावर आणि शिक्षक म्हणून वाटणा—या तळमळी बद्दल आपले विचार मांडले होते.
- दि. १४ ते १६ सप्टेंबर २०१९ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे राज्यस्तरीय पथसंचालन शिबिरात कु. शिला सत्यवान सावंत हिने महाविद्यालयाचे नेतृत्व केले होते.
- दि. १७ सप्टेंबर २०१९ रोजी 'सायबर क्राईम व सिक्युरिटी' या कार्यक्रमातंर्गत मा. श्री प्रविण सोनवने, उपनिरीक्षक, चिखली पोलीस स्टेशन, चिखली यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.
- दि. २४ सप्टेंबर २०१९ रोजी 'रासेयो स्थापना दिन' या कार्यक्रमातंर्गत ग्रामीण रूग्णालय, चिखली येथे रासेयोच्या वतीने १०० रूग्णांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे यांच्या उपस्थितीत फळवाटप करण्यात आले.
- दि. २७ सप्टेंबर २०१९ रोजी 'रक्तदान शिबिर' या कार्यक्रमांतर्गत रासेयो स्वयंसेवकांनी सामाजिक जाणीवतेची भान ठेवीत गरजू लोकांना आपल्या रक्तामुळे जीवनदान मिळावे म्हणून १० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री साई रक्तपेढी, अकोला यांचे सहकार्य लाभले होते.
- दि. १६ आक्टोबर २०१९ रोजी 'एड्स जनजागृती' या कार्यक्रमाअंतर्गत तरूणांमध्ये वाढत असणा—या HIV AIDS हया रोगाबद्दल जनजागृती व्हावी हया हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या करीता डॉ. भावना कॅम्बेल, डॉ. विलास गवळी, ग्रामीण रूग्णालय, चिखली यांनी विविध दृकश्राव्य साधनांव्दारे HIV बद्दल रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले होते.
- दि. १ डिसेंबर २०१९ रोजी 'वादविवाद स्पर्धा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जनसाक्षरता, ची लागण व स्वच्छता अभियान इत्यादी विषयांवर रासेयो स्वयंसेवकांनी मानवी मनाची भेद घेणारी मते मांडून वरील विषयाबद्दल जनजागृती केली होती.

- दि. २० डिसेंबर २०१९ रोजी 'संत गाडगेबाबा पुण्यतिथी' निमित्त महाविद्यालय, परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते.
- दि. २८ डिसेंबर २०१९ ते ४ जानेवारी २०२० या कालावधीत 'विशेष श्रमसंस्कार शिबिर' दत्तकग्राम – सातगांव भुसारी ता. चिखली जि. बुलडाणा येथे आयोजित करण्यात आले होते. हया शिबिरात प्लास्टिक मुक्तगांव, रेडीयम स्टीकर, व्यक्तीमत्व विकास व व्यसनमुक्ती, रस्ता दुरूस्ती, शोष खड्डे, कट्टा व आरोग्य शिबिर इत्यादी उपक्रम राबविण्यात आले होते.
- दि. १३ जानेवारी २०२० रोजी एड्स जनजागृती Online कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
- दि. १९ जानेवारी २०२० रोजी 'पल्स पोलिओ' मोहीमेत ५० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते.
- दि. १७ ते २७ जानेवारी २०२० या कालावधीत राज्यस्तरीय पथसंचालन शिबिर, मुंबई येथे महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. शिला सत्यवान सावंत हिने विद्यापीठाच्या चमूत महाविद्यालयाचे नेतृत्व मुंबई येथिल पथसंचालन शिबिरात केले.
- दि. १४ ते २० फेब्रुवारी २०२० या कालावधीत राष्ट्रीय एकात्मकता शिबिर कोक्राझार ओरिसा येथे महाविद्यालयाचे विद्यार्थी मयुर गजानन उमरे याने विद्यापीठाच्या चमूत सहभागी होऊन महाविद्यालयाचे नेतृत्व केले.
- दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजी 'शिवजयंती' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मा. डॉ. रामसिंग येवतीकर, सहायक कुलसचिव, संगाबाअवि, अमरावती व मा. प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले होते.
- दि. २२ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयात 'मातृभाषा दिवस' साजरा करण्यात आला होता.
- दि. ८ ते ९ मार्च २०२० या कालावधीत संगाबाअवि, अमरावती रासेयो विभागाच्या वतीने आयोजित महिला सक्षमीकरण या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वतीने रासेयो स्वयंसेविका कु. वैष्णवी चेके, कु. वैष्णवी बुंधे, कु. रेणुका निर्मळ व वैष्णवी मापारी यांनी सहभाग घेतला होता.
- दि. १ ते ५ एप्रिल या कालावधीत कोवीड १९ या आजाराबद्दल महाविद्यालय, दर्शनी भागावर प्लेक्स व स्वयंसेवकांच्या वतीने जनजागृती करण्यात आली होती.

Dr. V. R. PADWAL
NSS Programme Officer
Shri Shivaji Sc. & Arts College
Chikhli, Dist. Buldana

प्राचार्य
श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय
चिखली जि. बुलडाणा